# जगमान्य मानव आधिकार आणि मुलभूत स्वातंत्र्याचा आधिकार आबाधित रहाण्यासाठी व विस्तारासाठी व्यक्ती किंवा लोकसमूह अथवा समाज घटकांच्या हक्क व जबाबदारीचा जाहीरनामा

राष्ट्रीय मानव आधिकार आयोग,
फरीदकोट हाउस, कॉपर निकस मार्ग,
नवी दिल्ली 110001

# जगमान्य मानव आधिकार आणि मुलभूत स्वातंत्र्याचा आधिकार आबाधित रहाण्यासाठी व विस्तारासाठी व्यक्ती किंवा लोकसमूह अथवा समाज घटकांच्या हक्क व जबाबदारीचा जाहीरनामा

राष्ट्रीय मानव आधिकार आयोग,
फरीदकोट हाउस, कॉपर निकस मार्ग,
नवी दिल्ली 110001

संयुक्त राष्ट्राच्या

सर्वसाधारण सभेने दिं 9 डिसेंबर 1998 रोजी पारित केलेल्या ठराव क्रमांक 53 / 144 द्वारे स्विकृत केलेली उध्दीष्टे

सर्व देशातील सर्व नागरीकांच्या मानव आधिकाराचे व मुलभूत स्वातंत्र्याचा विस्तार आणि संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्र घटनेच्या उध्दिष्टाचे महत्व विषद करणे व त्याचे पालन करणे.

तसेच मानव आधिकारासंबधीचा जागतिक जाहिरनामा अंतरराष्ट्रीय मानव आधिकार कराराचे महत्व विषद करणे. जागतिक पातळीवरील मानवाची पंत व आधिकार मुलभूत आहे असे समजणे मानव आधिकार व मूलभूत

स्वातंत्र्य तसेच जागतिक किंवा प्रादेशिक पातळीवरील इतर मानव आधिकारांच्या तत्वप्रणलीचे पालन करणे. अंतरराष्ट्रीय समाजाने वैयक्तीक पणे अथवा सामुहिकपणे मानव आधिकार विस्ताराचे अमंलबजावनी चे कर्तव्य पार पाडणे तसेच मुलभूत हक्का संबधीचे कर्तव्य पार पाडणे असे कर्तव्य करताना जात, जमात, धर्म, वर्ण, लिंग, भाषा, राजकिय, किवा इतर बांधिलकी असंलेले वर्ग समाजामुळे जन्मध्यान किंवा इतर कोणत्याही दर्जाच्या आधारे कोणत्याही प्रकारचा भेदभाव होणार नाही याची दक्षता घेणे संयुक्त राष्ट्राच्या घटनेच्या उध्दीष्टांच्या पूर्ततेसाठी अंतरराष्ट्रीय समाजा– मध्ये सहकार्याची भावना जागवणे व त्याचे महत्त्व विषद करणे.

अंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षीतता आणि मानव आधिकाराची अमंलबजावणी मुलभूत स्वातंत्र्य याचा जवळचा संबध आहे याची जाणीव ठेवणे. परंतू अंतरराष्ट्रीय शांततेचा व सुरक्षीततेचा अभाव हा मानव आधिकार व मुलभूत स्वातंत्र्याची अमंलबजावणीतील अडथळा ठरवू शकत नाही.

मानव आधिकार व मुलभूत हक्क हे जागतिक अविभाज्य परस्परावलंबित व एक दूसऱ्याशी संलग्न आहेत याचा पुन्हा उल्लेख करून त्याचा न्याय व समतेच्या आधारावर अमंलबजावणी झाली पाहिजे यासाठी प्रयत्न करणे व कुणा एकाचीही हक्क व स्वातंत्र्याची पायमल्ली होणार नाहि याची काळजी घेणे.

मानव आधिकार व मुलभूत हक्क याचा व विस्तार अमंलबजावणी करण्याची प्राथमिक जबाबदारी

हि त्याच्या संबधित राज्याची असणार आहे.

राष्ट्रीय व अंतॅरराष्ट्रीय पातळीवर व्यक्ती समाजगट व समाज सघंटना यांच्यावर मानव आधिकार व मुलभूत हक्काचा आदरभाव निर्माण करण्याची व त्या वरिल ज्ञानात भर घालाण्याची जबाबदारी व हक्क रहिल.

**कलम 1**

प्रत्येकाला व्यक्तीगतरित्या व सामुहिकरित्या मानव आधिकार व मुलभूत हक्क विस्तार संरक्षण व अमंलबजावणी करण्याचा हक्क रहिल.

**कलम 2**

1) प्रत्येक राज्याची त्या मानव आधिकार व मुलभूत हक्क विस्तार, संरक्षण व अमंलबजावणी करण्याची प्राथमिक

जबाबदारी रहिल.यासाठी सामाजिक, आर्थिक व राजकिय पातळीवर आवश्यक ते उपाययोजना करण्याची किंवा वातावरण निर्माण करण्याची प्राथमिक जबाबदारी प्रत्येक राज्याची आहे, तसेच आपल्या राज्यातील सर्व नागरिकाना वैयक्तिक व सामूहिकरित्या संबधित हक्क व स्वातत्र्या उपभोगणासाठी कायदेशीर आधिकार प्राप्त करूण देण्याची जबाबदारी संबधित राज्याची आहे.

2) याव्दारे प्रदान करण्यात आलेल्या हक्क व स्वातन्त्र्यांची योग्य अमंलबजावणी होण्यासाठी प्रत्येक राज्याने कायदेशीर प्रशासकिय व इतर पातळिवर आवश्यक ते उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे.

## कालम 3

मानव आधिकार व मुलभूत हक्क विस्तार संरक्षण व योग्य अमंलबजावणी संबधित देशातील कायदे व त्याला सुसंगत असणारे संयुक्त राष्ट्राच्या घटनेतील नियम व इतर अंतरराष्ट्रीय नियम याच्या कार्यक्षेत्राच्या चौकटित राहून पूर्ण करावयाची आहे. आणि याच नियमाच्या आणि कार्यक्षत्राच्या आधिन राहून संबधित हक्क व स्वातत्र्यांची पूर्तता झाली पाहिजे.

## कलम 4

याव्दारे जाहिर करण्यात आलेल्या तरतुदीचा अर्थ असा होणार नाही की त्या संयुक्त राष्ट्राच्या उध्दीष्टाची किंवा घटनेतील तरतुदीशी असुसंगत किंवा विरोधाभास दर्शवणारा आहे. किंवा त्याचा असा हि अर्थ होणार नाहि की जागतिक मानव

आधिकार जाहिरनामा व अंतरराष्ट्रीय मानव आधिकार करारनामा किंवा याबाबतीतील इतर अंतरराष्ट्रीय दस्तावेज किंवा बांधिलकी यांच्याशी त्या मर्यादा किंवा अप्रतिष्ठा आणणाऱ्या आहेत.

## कलम 5

प्रत्येकाला वैयक्तिक पणे अथवा सामूहिक पणे राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवर मानव आधिकार व मुलभूत हक्क विस्तार व संरक्षण करण्यासाठी खालील हक्क आहेत असे समजण्यात येईल.

अ) शांतपणे सभा अथवा मेळावा घेणे.

ब) गैर शासकीय संस्था किवा सामाजिक संस्था समाजगट स्थापण करणे.किवा त्यामध्ये सभासद होणे किंवा भाग घेणे.

क) गैर शासकीय किंवा शासना अंतर्गत किंवा

मानसिक आरोग्य निगडीत संस्थेशी विचार विनिमय करणे.

कलम 6

प्रत्येकाला वैयक्तिक व सामूहिकरित्या पुढिल आधिकार असतील:

अ) सर्व मानव आधिकार व मुलभूत हक्क या बाबत माहिती मिळवणे शोधणे प्राप्त करणे अथवा संग्रह टेवणे तसेच देशाअंर्तगत कायद्यान्वये किंवा न्यायिक व प्रशासकिय मार्गाने संबधित आधिकार हक्काची अमंलबजावणी कशी होते याची माहिती मिळवणे.

ब) मानव आधिकाराचा मुक्तपणे प्रचार, प्रसिद्धि, प्रदान किंवा वितरण अंतरराष्ट्रीय दस्तावेजामध्ये या बाबत ज्या तरतूदि आहेत

त्याला अनूसरण करणे तसेच मानव आधिकार व मुलभूत हक्क या बाबतचे ज्ञान मतप्रवाह याची इतराना वरिल दस्तावेजाप्रमाणे माहिती देणे.

क) मानव आधिकार व मुलभूत हक्क कायद्याच्या व प्रत्यक्ष अमंलबजावणीचा अभ्यास करणे आणि या माध्यमातुन किंवा इतर योग्य मार्गाने जनमत गोळा करणे व त्याचे याकडे लक्ष वेधने.

**कलम 7**

नवीन मानव आधिकाराच्या कल्पना व तत्त्वे विकसीत करणे व त्यावर चर्चासत्र घडवूण आणने व त्याची स्विकृती घडवुन आणने प्रत्येकाला वैयक्तिक व सामूहिकरित्या आधिकार असेल.

## कलम 8

1) प्रत्येकाला वैयक्तिक व सामूहिकरित्या कुठलाहि प्रकारचा भेदभाव न होता त्याच्या किंवा तिच्या देशाच्या सरकार मध्ये भाग घेता येईल आणि सार्वजनिक कामे करता येतील

2) यामध्ये वैयक्तिक व सामूहिकरित्या सरकारी प्राधिकरणाला उपक्रमाला किंवा संस्थाना ज्या सार्वजनिक कामे करतात त्या बाबतची टिप्पनी किंवा त्रूटीचा अहवाल सादर करण्यचा आधिकार राहिल. व त्यावर दुरूस्ती उपाय योजना चा अहवाल सादर करण्यचा आधिकार राहिल. तसेच या सार्वजनिक कामामध्ये लक्ष वेधुन अडथळे व अडचणी दूर करणे मानव आधिकार व मुलभूत हक्क याची जाणीव संरक्षण व प्रसार घडवूण आणण्याचा आधिकार असेल.

## कलम 9

1) मानव आधिकार व मुलभूत हक्काचे उल्लंघण झाल्यास प्रत्येकाला वैयक्तिक व सामूहिकरित्या याव्दारे जाहिर करण्यात आलेल्या व सदरिल हक्काचे आधिकाराचे संरक्षण व प्रसार करताना पुर्ण संरक्षण मिळवण्याचा व उचित उपाययोजना प्राप्त करून घेण्याचा आधिकार राहिल.

2) हे करत असताना ज्याच्या हक्काचे स्वातत्र्यांचे उल्लघण झाले आहे त्याना स्वत: किंवा कायदेशीर सल्लागारामार्फत कायद्याने अथवा इतर प्रशासनाने नेमनुक केलेल्या स्वातत्र्य उचित व नि:पक्षपाती न्यायिक आधिकारासमोर तक्रार करण्याचा व तक्रारीचे त्वरित निसरन करून घेण्याचा आधिकार असेल आणि विना विलंब

कायदेशीर निर्णय प्राप्त करून घेण्याचा आधिकार असेल. ज्या निर्णयामध्ये तक्रारीची दाद किंवा अवश्यक तो मोबदला असेल, तसेच सदरिल निर्णयाची विना विलंब अमंलबजावणी करूण घेण्याचा आधिकार असेल.

3) याच बाबत पुन्हा प्रत्येकाला वैयक्तिक व सामूहिकपणे खालील प्रकारचे आधिकार असतील.

अ) मानव आधिकार व मुलभूत हक्काची पायमल्ली झाल्यास योग्य त्या स्थानीक न्यायिक किंवा प्रशासकिय किंवा कायदेमंडळ आधिकाराकडे कायदेशीर व इतर अर्जाव्दारे सरकारी आधिकाऱ्याच्या किंवा शासकिय संस्थाच्या कार्याची अथवा धोरणाची तक्रार

करता येईल. अशी तक्रार राज्याच्या इतर कायदेप्रणाली प्रमाणे नेमलेल्या उचित न्यायिक आधिकाऱ्या समोर सूद्धा करता येईल व अशा आधिकाऱ्यावर विना विलंब निर्णय देणे बंधणकारक राहिल.

ब) राष्ट्रीय कायदा किंवा अंतरराष्ट्रीय कर्तव्य अथवा बांधिलकी याची पुर्तता होते किंवा नाहि हे निच्छित करण्यासाठी जी सार्वजनीक कामकाज अथवा चौकशी किंवा बाजू मांडण्यासाठी प्रक्रिया होईल तेथे हजर राहण्याचा आधिकार असेल.

क) मानव आधिकार व मुलभूत हक्काच्या संरक्षणासाठी व्यावसायिक कायदेतज्ञ प्रतिनिधी कायद्याचा सल्ला व इतर मदत देण्यासाठी नेमनुक करावयाचा आधिकार राहिल.

4) प्रत्येकाला वैयक्तिक व सामूहिकपणे अंतरराष्ट्रीय दस्तावेज वा पद्धतीप्रमाणे मानव आधिकार व मुलभूत हक्का संबधी साधरण किंवा विशेष उद्धीष्टे अंतरराष्ट्रीय संस्थाशी सातत्याने संपर्क करण्याचा आधिकार राहिल.

5) राज्याने आपल्या कार्यक्षेत्रात किंवा एखाद्या प्रदेशात मानव आधिकार व मुलभूत हक्काची पायमल्ली झाली आहे असे दिसुन आल्यास त्याची निःपक्षपातीपणे त्वरित चौकशी करणे अथवा चौकशी होईल अशी व्यावस्था करण्याची जबाबदारी त्या राज्याची असणार आहे.

**कलम 10**

मानव आधिकार व मुलभूत हक्काची पायमल्ली होईल अश्या कृत्यात कुणीही सहभागी होउ

नये किंवा गरज भासल्यास एखादे कृत्य न केल्याने वरिल पायमल्ली टळत असेल तर तसे करावे वरिल प्रमाणे कृती केल्याने कुणलाही शिक्षा होणार नाही किंवा प्रतिकुल परिस्थिती चा सामना करावा लागणार नाही.

## कलम 11

प्रत्येकाला वैयक्तिक व सामूहिकपणे आपला कायदेशीर धंदा किंवा व्यवसाय करण्याचा आधिकार राहिल. आपला धंदा किंवा व्यवसाय करताना मानव आधिकार मानवाचा दर्जा किंवा मुलभूत हक्क याचा अधिकार राहिल. याची दक्षता घ्यावी आणि आपला व्यवसाय करताना अंतरराष्ट्रीय दर्जाच्या धंदे विषयक किंवा व्यवसायीक आचार संहितेचे पुर्तता होईल याची काळजी घ्यावी.

## कलम 12

1) प्रत्येकाला वैयक्तिक व सामूहिकपणे शांततेच्या मार्गाने मानव आधिकार व मुलभूत हक्काची पायमल्ली होणार नाही अशा कार्यात सहभागी होण्याचा आधिकार असेल.

2) या दस्ताऐवजामध्ये जाहिर केलेल्या हक्क व आधिकारांचा कायदेशिर अंवलंब करताना एखाद्या व्याक्तीवर जर अत्याचार, धमकी, सुड उगवणारा हल्ला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भेदभाव, दबाव किंवा इतर कोणात्याही प्रकारचे जूलमी कृत्य होत असल्यास राज्याची प्रत्येकाची व्याक्तीगत किंवा सामूहिकपणे योग्य त्या यंत्रणेव्दारे संरक्षण देण्याची उपाय योजना करावयाची जबाबदारी आहे.

3) मानव आधिकार व मुलभूत हक्काची पायमल्ली होत असल्यास किंवा एखाद्या व्याक्तीने किंवा गटाने वरिल हक्कावर अत्याचार केल्यास त्याचा शांततेच्या मार्गाने विरोध करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला किंवा समूहाला त्यांच्या कृत्याला किंवा अकृत्याला देशाच्या कायद्याला अनूसरून समर्पक संरक्षण देणाची राज्याची जबाबदारी आहे.

**कलम 13**

या दस्ताऐवज कलम 3 प्रमाणे च शांततेच्या मार्गाने प्रत्येकाला वैयक्तिक व सामूहिकपणे मानव आधिकार व मुलभूत हक्काचा प्रसार करण्याच्या स्पष्ट हेतूसाठी साधन संप्पत्ती मिळवण्याचा व वापरण्याचा आधिकार राहिल.

कलम 14

1) राज्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व व्याक्तीना त्याच्या सामाजीक, आर्थिक, राजकिय व नागरी हक्काची जाणीव व्हावी यासाठी राज्याने कायदेमंडळाव्दारे न्यायिक मार्गाने प्रशासकिय मार्गाने अथवा इतर योग्य त्या साधनाव्दारे अशी जाणीव व ज्ञान उपलब्ध करून देण्याची राज्याची जबाबदारी आहे.

2) अशा साधनामध्ये खालील गोष्टीचा अर्तभाव असेल

अ) देशातील कायद्याच्या व नियमावलीच्या पुस्तकाचे प्रकाशन व व्यापक प्रसिद्धी करणे तसेच अंतरराष्ट्रीय मानव आधिकाराबाबत लागू असलेल्या दस्ताऐवजाचे प्रकाशन व व्यापक प्रसिद्धी करणे.

ब) मानवी आधिकारावरील अंतरराष्ट्रीय कागदपत्रांची पूर्ण व सर्वांना सारख्या प्रमाणतील उपलब्दी अंतरराष्ट्रीय करारान्वये स्थापन झालेल्या संस्थाना सरकारने द्यावयाचा नियत कालिक अहवाल व चर्चेचा संक्षित वृतांत.

3) राज्याने आपल्या कार्यक्षेत्रातील प्रदेशासाठी मानव आधिकार व मुलभूत हक्काच्या विस्तारासाठी व संरक्षणसाठी आवश्यक वाटल्यास आणखी स्वंतत्र राष्ट्रीय संस्था निर्मान करून विकसीत करावी व मदत उपलब्ध करून द्यावी अशी अंस्था मानव आधिकार मंडळ चौकशी समिती किंवा इतर राष्ट्रीय उपक्रमाच्या स्वरूपात असतील.

**कलम 15**

मानव आधिकार व मुलभूत हक्क यांच्या

शिक्षणाची सर्व शैक्षणीक स्तरावर सोय उपलब्ध करून देण्याची व ती विकसीत कराण्यची जबाबदारी राज्यावर राहिल. वकिल कायद्याची अमंलबजावनी करणारे आधिकारी सैन्यदलातील कर्मचारी व आधिकारी व सार्वजनिक क्षेत्रातील आधिकारी यांच्यासाठी जो अभ्यासक्रम असेल त्यामध्ये मानव आधिकाराच्या मूलतत्वाचा समावेश असणे आवश्यक आहे.

**कलम 16**

मानव आधिकार व मुलभूत हक्काची समाजा–मध्ये जाणीव व महत्व पटवून देण्यासाठी व्यक्ती सामाजिक संस्था व ना–शासकिय तत्वावर चालणाऱ्या संस्थाची भुमिका महत्वाची आहे. अशा व्याक्ती किंवा संस्था शिक्षण प्रशिक्षण संशोधनाव्दारे देशादेशातील सर्व जाती धर्मातील ज्या समाजामध्ये अशा संस्था काम करतात

अशी वेगवेगळी पुर्वपिढीका असणाऱ्या समाजामध्ये समजूतीने, सहनशिलतेने शांततेने व मैत्रीपूर्ण संबधाने मानव आधिकार व मुलभूत हक्काची जाणीव अधिक वृद्धिंगत करतात.

**कलम 17**

1) समाजामध्ये प्रत्येक व्यक्तीची आपल्या समाजसबंधातील कर्तव्ये पुर्ण करण्याची जबाबदारी आंहे. कारण त्याचा किंवा तिचा व्यक्तीमत्वाचा विकास पुर्णपणे व मुक्त पणे होण्याचा संभव त्याच समाजामध्ये असतो.

2) लोकशाहीचे संरक्षण मानव आधिकार व मुलभूत हक्काचा प्रसार लोकशाही तत्वावरिल समाज, संस्था, किंवा प्रक्रिया निर्मिती या गोष्टी करण्यासाठी व्याक्ती, गट, ना–शासकिय तत्वावरिल संस्था व इतर संस्था भुमिका महत्वाची आहे.

3) जागतीक मानव आधिकार जाहीरनामा मध्ये मानव आधिकार दस्ताऐवजा मध्ये नमुद केलेल्या सामाजीक व जागतीक शिस्त नियमासंबधीचा प्रत्येकाचा आधिकार वृद्धिंगत करण्यासाठी व्याक्ती, गट, संस्था, ना–शासकिय संस्था, याची भुमिका महत्वाची आहे.

**कलम 18**

या दस्ताऐवजा मध्ये जाहीर केलेल्या हक्क आणि स्वातंत्र्याच्या आमंलबजावनीमध्ये प्रत्येकाला व्यक्तीशः किंवा सामूहिकपणे फक्त अंतरराष्ट्रीय कर्तव्यामध्ये समाविष्ट असलेल्या मर्यादा लागु होतील तसेच लोकशाही समाजामध्ये त्याच्या नैतीकतेच्या समाजशिस्तीच्या व समाज कल्पनाच्या ज्या न्याय गरजा आहेत त्या पूर्ण करण्यासाठी अशा मर्यादा लागु होतील तसेच इतराचे हक्क व आधिकारांची मान्यता व सन्मान

प्रस्थापित करण्यासाठी या संबधीचा कायद्याने घालून दिलेल्या मर्यादा लागू होतील.

**कलम 19**

या दस्ताऐवजामध्ये जाहीर केलेल्या कोणत्याही गोष्टीचा असा अर्थ होणार नाही की कुणी व्यक्ती गट; समाजगट, समाजघटक अथवा राज्य यांना मानवी हक्क आणि स्वातंत्र्याचा विद्धवस्त करण्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आधिकार राहिल.

**कलम 20**

या दस्ताऐवजामध्ये जाहीर केलेल्या कोणत्याही गोर्ष्टीचा असा अर्थ होणार नाही की ज्याव्दारे संयूक्त राष्ट्राच्या घटनेच्या तरतुदी विरूद्ध कार्य करण्याचा व्यक्ती, गट, लोकसमूह संस्था किंवा ना—शासकिय तत्वावर चालणाऱ्या संस्था यांना राज्य पुरस्कृत आधिकार राहिल.